रोहित पवारांनी वस्तुस्थितीचा अभ्यास करावा

'भाजयुमो'च्या जिल्हाध्यक्षांचा सल्ला

पुणे : 'उजनी 'एआय डेटा सेंटर' प्रकल्पाला विरोध म्हणजे सोलापूरच्या विकासाला विरोध', अशी भूमिका घेऊन 'केवळ राजकीय आरोप करण्याऐवजी आमदार रोहित पवार यांनी वस्तुस्थितीचा अभ्यास करावा,' असा सल्ला भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष वैभव सोलनकर यांनी मंगळवारी दिला. 'बारामती ॲग्रो कारखान्याच्या पाणीवापराचा आणि प्रदूषणाच्या तक्रारींचा हिशेब रोहित पवार यांनी जनतेसमोर मांडावा,' असे आव्हान सोलनकर यांनी पत्रकार परिषदेत दिले.

सोलनकर म्हणाले, 'प्रस्तावित प्रकल्पानुसार उजनी जलाशयाच्या केवळ नऊ टक्के क्षेत्रावर फ्लोटिंग सोलार उभारण्यात येणार आहे. प्रकल्पातून २८०० कायमस्वरूपी आणि ४० हजार प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी अपेक्षित आहेत. डेटा सेंटरचे प्रक्रिया सांडपाणी जलाशयात किंवा नदीत सोडण्याचे नियोजन नाही. फ्लोटिंग सोलारमधून महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाला वार्षिक १८० कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित आहे.'

शहरात सायबर चोरट्यांचा धुमाकूळ

'डिजिटल ॲरेस्ट'ची भीती दाखवून नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : शहरात 'डिजिटल ॲरेस्ट'ची भीती दाखवून, अमली पदार्थ तस्करी प्रकरणात अटकेची भीती दाखवून, आभासी चलनात गुंतवणुकीच्या आमिषाने आणि वाहतूक नियमभंगाचे बनावट चलन पाठवून सायबर चोरांनी नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याच्या घटना घडल्या आहेत.

नाशिक येथील एका बँकेची दोन कोटींची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी अटकेची भीती दाखवून सायबर चोरट्यांनी कर्वेनगर भागातील एका ज्येष्ठ महिलेची ३२ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध वारजे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

या बाबत एका ७५ वर्षीय ज्येष्ठ महिलेने वारजे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ज्येष्ठ महिला कर्वेनगर भागातील एका सोसायटीत राहायला आहेत. ६ नोव्हेंबर रोजी सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. नाशिक येथील एका बँकेची दोन कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फसवणुकीतील रक्कम ज्येष्ठ महिलेच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिसांकडून अटक (डिजिटल ॲरेस्ट) करण्यात येणार आहे, तसेच मालमत्ता जप्त करण्यात येणार आहे, अशी भीती चोरट्यांनी त्यांना दाखवली. अटक टाळण्यासाठी तातडीने पैसे भरावे लागतील, असे सांगून चोरट्यांनी त्यांना धमकावले. त्यानंतर महिलेने चोरट्यांच्या बँक खात्यात गेल्या दोन ते तीन दिवसांत आरटीजीएस सुविधेचा वापर करून ३२ लाख रुपये जमा केले. पैसे जमा केल्यानंतर महिलेकडे आणखी पैशांची मागणी करण्यात आली. महिलेने चौकशी केली. तेव्हा फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला. गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक सुवर्णा हुलवान तपास करीत आहेत.

बनावट चलन पाठवून गंडा

- वाहतूक नियमभंगाचे बनावट चलन पाठवून व्यावसायिकाची सायबर चोरट्यांनी सहा लाख ८७ हजार रुपयांची फसवणूक केली. याबाबत एका व्यावसायिकाने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार हे व्यावसायिक आहेत. पुणे-सातारा रस्त्यावरील एका सोसायटीत ते राहायला आहेत.
- चोरट्यांनी त्यांना वाहतूक नियमभंगाचे बनावट चलन पाठविले. दंडाची रक्कम न भरल्यास कारवाईची भीती दाखवून त्यांना पैसे जमा करण्यास सांगितले. चोरट्यांनी त्यांच्या बँक खात्याची माहिती घेतली. या माहितीचा गैरवापर केला. तक्रारदाराच्या बँक खात्यातून चोरट्यांनी पैसे काढून घेतले. ही रक्कम दुसऱ्या एका खात्यात जमा करण्यात आली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विकास भारमळ तपास करत आहेत.

अटकेची भीती दाखवून फसवणूक

अमली पदार्थ तस्करीत कारवाईची भीती दाखवून सायबर चोरट्यांनी भारती विद्यापीठ परिसरातील एकाची पाच लाख २० हजार रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एकाने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार हे आंबेगाव बुद्रुक परिसरातील एका सोसायटीत राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. दिल्लीतील दूरसंचार विभागातून बोलत असल्याची बतावणी केली. मोबाइल क्रमांकाचा वापर अमली पदार्थ तस्करीसाठी करण्यात आला असून, या प्रकरणात अटक करण्यात येणार आहे, अशी भीती चोरट्यांनी त्यांना दाखविली. त्यानंतर अटक टाळण्यासाठी तातडीने पैसे भरण्यास सांगितले. चोरट्यांच्या खात्यात त्यांनी पाच लाख २० हजार रुपये जमा केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली असून, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रंगराव पवार तपास करत आहेत.

आभासी चलनात गुंतवणुकीच्या आमिषाने एका व्यावसायिक तरुणाची सायबर चोरट्यांनी पाच लाख १३ हजार रुपयांची फसवणूक केली. बिबवेवाडी पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत तरुणाने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर चोरट्यांनी तरुणाच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधून आभासी चलनात गुंतवणुकीचे आमिष दाखविले. त्यानंतर तरुणाने चोरट्यांच्या खात्यात पैसे जमा केले. पैसे जमा केल्यानंतर त्यांना परतावा देण्यात आला नाही.

दिवाळीत दोन लाख किलो लाडू-चिवड्याची विक्री

'दि पूना मर्चंट्स चेंबर'च्या उपक्रमाला प्रतिसाद

लोकसत्ता प्रतिनिधी



पुणे : सामान्यांची दिवाळी गोड करण्यासाठी गेली ३९ वर्षे राबविण्यात येत असलेल्या 'दि पूना मर्चंट्स चेंबर'च्या रास्त दरात लाडू-चिवडा विक्री उपक्रमास पुणेकरांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा लाडू-चिवड्याच्या विक्रीत १० ते १५ टक्क्यांनी वाढ झाली असून, दोन लाख किलो लाडू-चिवड्याची विक्री करण्यात आली.

'रास्त दरात लाडू-चिवडा उपक्रमामागे चव आणि दर्जाबरोबरच नियोजनबद्ध व्यवस्थापनाचा मोठा वाटा आहे. लाडू-चिवड्याची निर्मिती, कच्च्या मालाची निवड, स्वच्छता, पॅकिंग, वजन, दर आणि वितरण या प्रत्येक टप्प्यावर चेंबरने विशेष लक्ष दिले होते. अन्न आणि औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिलेल्या सूचनांनुसार अन्नसुरक्षा आणि स्वच्छतेच्या निकषांचे पालन करण्यात आले.

दिवाळीत चेंबरने शहरातील विविध भागात विक्री केंद्रे सुरू केली होती. लाडू-चिवडा नागरिकांनी रांगा लावून खरेदी केला. पुणेकरांच्या विश्वासावर हा उपक्रम यशस्वी झाला', अशी माहिती 'दि पूना मर्चंट्स चेंबर'चे अध्यक्ष राजेंद्र बाठिया यांनी दिली.

'बाजारातील स्पर्धा आणि बदलत्या ग्राहकांच्या अपेक्षा लक्षात घेऊनही चेंबरने रास्त दरात दर्जेदार फराळ उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट कायम ठेवले आहे. चेंबरच्या या उपक्रमाची दखल राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातूनही घेण्यात आली. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी विशेष शुभसंदेश पाठवून ३९ वर्षांच्या सातत्यपूर्ण वाटचालीबद्दल अभिनंदन केले', असे बाठिया यांनी नमूद केले.

दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांची दिवाळी गोड

चेंबरने सामाजिक बांधिलकी जपून सामन्यांची दिवाळी गोड व्हावी, या विचाराने हा उपक्रम सुरू केला. मराठवाड्यातील धाराशीव, उमरगा भागातील दुष्काळग्रस्त गावात लाडू-चिवड्याची पाकिटे वितरित केली. पणनमंत्री जयकुमार रावल यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

उपक्रमासाठी राबणाऱ्यांचा सन्मान

दोन लाख लाडू-चिवडा विक्रीचा टप्पा पार करण्यामागे कामगार, पुरवठादार, वितरक, स्वयंसेवकांची मेहनत आहे. त्यांच्या योगदानाची दखल चेंबरने घेतली. सोमवारी पार पडलेल्या कृतज्ञता सोहळ्यात त्यांचा सन्मान करण्यात आला. लाडू-चिवडा तयार करणारे आचारी पप्पू महाराज, त्यांचे चिरंजीव हेमंत गौड, तसेच या उपक्रमासाठी जागा उपलब्ध करुन देणारे अचल जैन यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या वेळी जितोचे माजी अध्यक्ष विजय भंडारी, डॉ. विजय सेटिया, मार्केट यार्ड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन भोईर, नगरसेवक मनीषा चोरबेले, गौरव घुले, बाळासाहेब ओसवाल, मानसी देशपांडे, ग्राहक पेठेचे सूर्यकांत पाठक, ललित गुंदेचा, ईश्वर नहार नवीन गोयल, दिनेश मेहता, प्रणव गुगले, आशिष दुगड यांच्यासह चेंबरचे पदाधिकारी, व्यापारी उपस्थित होते.





जाहीर सूचना

तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, मे. सिद्धेश डेव्हलपर्स यांचा प्रस्तावित व्यावसायिक प्रकल्प म्हाळुंगे पुणे सं. नं. १२/१४/१, म्हाळुंगे, तालुका मुळशी, जिल्हा पुणे, महाराष्ट्र येथे मे. सिद्धेश डेव्हलपर्स यांच्या तर्फे बांधण्यात येणार आहे. या प्रकल्पास पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या कडून पर्यावरण विषयक परवानगी मिळाली असून पत्र क्रमांक EC Identification No. EC26C3801MH5523964N आणि EC file SIA/MH/INFRA2/580139/2026 दि.४/११/२०२६, परिवेश वेबसाइट वर दिनांक ४/११/२०२६ ला अपलोड झाले आहे. सदर पर्यावरण विषयक परवानगी महाराष्ट्र शासनाच्या https://parivesh.nic.in/ या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

सही,
मे. सिद्धेश डेव्हलपर्स.

महापालिका मालमत्तांच्या डिजिटल सर्वेक्षणाची मागणी

पुणे : पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या शहरातील तसेच महापालिकेत नव्याने समाविष्ट गावांमधील सर्व स्थावर मालमत्तांचे सर्वेक्षण करून त्यांची डिजिटल नोंदणी करावी, अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक हरिदास चरवड यांनी केली आहे. महापालिकेच्या मालकीच्या मालमत्तांचा योग्य वापर होतो का, यामधून नक्की किती उत्पन्न मिळते आणि देखभाल-दुरुस्तीवर किती खर्च होतो, याचा हिशेब पारदर्शकपणे ठेवण्यासाठी त्यांचे आर्थिक लेखापरीक्षण करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

महापालिका मालकीच्या अनेक मालमत्ता विविध संस्था तसेच व्यक्तींना भाडेतत्त्वावर देण्यात आल्या आहेत. या मालमत्तांचे करार, त्यांना आकारण्यात येत असलेले भाडे, त्यांची मुदत, नूतनीकरण आणि अटी-शर्तींचा आढावा घेऊन प्रचलित बाजारभाव यानुसार या मालमत्तांचे भाडे निश्चित करण्याची आवश्यकता आहे. अपेक्षित उत्पन्न आणि प्रत्यक्ष उत्पन्न, थकीत भाडे तसेच दुरुस्तीवरील खर्च यांच लेखापरीक्षण करून प्रलंबित थकबाकीची वसुली करण्यावरही भर देण्याची आवश्यकता आहे.

सदनिकाविक्रीची जाहिरात परस्पर केल्याने तक्रार

लोकसत्ता प्रतिनिधी

पोलिसांकडे तक्रार करण्याचे आवाहन

ज्येष्ठ नागरिकांना कोणी त्रास देत असल्यास याबाबतची तक्रार स्थानिक पोलीस ठाणे किंवा पोलीस आयुक्तालयात करावी. ज्येष्ठ नागरिकांच्या मालमत्तेबाबत परस्पर कोणी व्यवहार करत असल्यास त्वरित तक्रार करावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

पुणे : मॉडेल कॉलनीत भागात वास्तव्यास असलेल्या एका ज्येष्ठ नागरिकाची सदनिका विक्रीसाठी असल्याबाबतची ऑनलाइन जाहिरात प्रसारित करण्यात आली. संबंधित जाहिरात प्रसारित झाल्याचे लक्षात आल्यानंतर ज्येष्ठ नागरिकाने चतुःशृंगी पोलीस ठाण्यात नुकतीच तक्रार दिली.

शिवाजीनगर भागातील मॉडेल कॉलनीत असलेल्या एका सोसायटीत ज्येष्ठ नागरिकाची सदनिका आहे. बाराव्या मजल्यावरील चार बीएचके सदनिका पाच कोटी रुपयांना विक्री करण्याबाबत जाहिरात एका संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आली. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकाला मानसिक त्रास सहन करावा लागला. त्यांनी चतुःशृंगी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. संबंधित जाहिरात एका दलालामार्फत प्रसारित करण्यात आली असून, पोलिसांनी त्याला जाहिरात हटविण्यास सांगितले आहे. त्याला सदनिका विक्रीबाबत जाहिरात प्रसारित करण्यास सांगणाऱ्या व्यक्तीचा शोध घेण्यात येत आहे. सदनिका विक्रीबाबतची जाहिरात प्रसारित करण्याबाबत कोणालाही सांगण्यात आले नव्हते. जाहिरातीत दोन हजार ७५८ चौरस फूट सदनिकेची विक्री पाच कोटी रुपयांना करण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिक निवृत्त आहे. आपल्या मालकीची सदनिका विक्रीसाठी असल्याची जाहिरात परस्पर प्रसारित करण्यात आल्याने मानसिक त्रास झाला. परवानगीशिवाय सदनिका विक्रीचा व्यवहार करण्याची शक्यता आहे. या प्रकाराची चौकशी करण्याची मागणी त्यांनी पोलिसांकडे तक्रारीद्वारे केली आहे.

जाहीर निवेदन

मेसर्स एफ. एस. मझदा आणि पिनाक हाउसिंग असोसिएट्स एलएलपी यांच्या "Perinsheri Pinnac Greens" Phase - 2 या प्रस्तावित निवासी प्रकल्पास, सर्व्हे क्र. १२४/५ (सी.टी.एस. क्र. ११६०), सर्व्हे क्र. १२४/६ (सी.टी.एस. क्र. ११५४), सर्व्हे क्र. १२४/७ (भाग) (सी.टी.एस. क्र. ११५७ (भाग)) आणि सर्व्हे क्र. १२४/९/१ (भाग) (सी.टी.एस. क्र. ११५६ (भाग)), कोथरूड, पुणे, महाराष्ट्र येथे, राज्यस्तरीय पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA), महाराष्ट्र यांच्याकडून दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या पत्राद्वारे पर्यावरणीय मंजुरी (Environmental Clearance) प्रदान करण्यात आली आहे. सदर मंजुरीचा EC Identification No. EC26C3801MH5865186N आणि File No. SIA/MH/INFRA2/589676/2026 असा आहे.

सदर पर्यावरणीय मंजुरी पत्राची प्रत पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या PARIVESH संकेतस्थळावर https://parivesh.nic.in येथे उपलब्ध आहे.

स्थळ: पुणे
दिनांक: १०/११/२०२६

मे. एफ. एस. मझदा आणि पिनाक हाउसिंग असोसिएट्स एलएलपी

शुद्धिपत्रक

हे शुद्धिपत्रक स्टँडर्ड चार्टर्ड बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे दिनांक ०७.११.२०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या लिलाव सूचनेच्या संदर्भात जारी करण्यात येत आहे, ज्यामध्ये लिलावाची तारीख चुकून ०२.१२.२०२६ ऐवजी २४.११.२०२६ अशी नमूद करण्यात आली होती आणि ऑनलाईन निविदा आणि अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख चुकून ०१.१२.२०२६ ऐवजी २३.११.२०२६ अशी नमूद करण्यात आली होती.

त्यानुसार, लिलावाची तारीख ०२.१२.२०२६ अशी वाचावी आणि ऑनलाईन निविदा व अर्ज सादर करण्याची तारीख ०१.१२.२०२६ अशी वाचावी.

दिनांक : १०/११/२०२६
ठिकाण: पुणे

सही/-
प्राधिकृत अधिकारी
स्टँडर्ड चार्टर्ड बँक

परिशिष्ट – IV-A – अचल मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालय :- ७वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तूरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली – 110001, फोन :- 011-23357171, 23357172, 23705414, वेब. :- www.pnbhousing.com

शाखा चाकण : युनिट क्र 16 आणि 17, दुसरा मजला, बिझनेस स्केअर, बिल्डिंग जमीन संबंधित गट क्र 1638 (जुना गट क्र 3596) आणि गट क्र 1639 (जुना गट क्र 3597) यावर बांधलेले, चाकण, तालुका खेड जिल्हा पुणे – 410501 येथे स्थित.

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भाग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी रचनात्मक / प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ - सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची "जशी आहे जेथे आहे" आणि "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल.

याद्वारे ही सूचना सह दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम - 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊन करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा ठेव (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे / न्यायालयीन कजे (के)
NHL/RCKN/0325/5163740, गोविंद शिवाजी शिवरकर / सारिका गोविंद शिवरकर, शाखा : रोशनी_चाकण	रु. 12,95,118 आणि 07.11.25	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट क्र. 505, गट क्र. 226, पाचवा मजला, जुना गट क्र. 1248, भाग्यलक्ष्मी अपार्टमेंट ची फूट, पुणे, पुणे नगर रोड, पुणे, महाराष्ट्र, भारत, 412207.	रु. 15,05,000	रु. 1,50,500	25/11/2026	रु. 10,000	17-11-2026 दु. 12:00 ते दु. 04:00	26-11-2026 दु. 2 ते दु. 03:00	ज्ञात नाही

*सोबत भरण्याच्या व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोजांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. (1) आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही आणि स्थितीचा उल्लेख स्तंभ क्र.- के मध्ये केला आहे. (2) संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंतचे मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तींवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. (3) कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार किंवा किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करायची लागेल अन्यथा अशा टेबी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनियर्ष कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त केले आणि मालमत्ता / अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. (4) सी१ इंडिया प्रायवेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003, वेबसाइट - www.bankeauctions.com, मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, पीएनबीएचएफएलचे प्राधिकृत व्यक्ती - गणेश अंकुश / निलाक्षी पाटील, अन्वर मुलाणी / प्रकाश माळी, टोल फ्री क्र. : 1800 120 8800, ई-मेल : auction@pnbhousing.com, यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

ठिकाण :- चाकण, दिनांक :- 10.11.2026

स्वा./- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

परिशिष्ट - IV-A - अचल मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालय :- ७वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तूरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली – 110001, फोन्स :- 011-23357171, 23357172, 23705414, वेब. :- www.pnbhousing.com

शाखा पुणे : युनिट क्र. 601, 602, 603, 604, 605, 606, 6 वा मजला, प्राइड हॉटेल कॉन्व्हलेक्स च्या मागे, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र - 411005, **शाखा वारजे :** 12, स्पंदन, सर्व्हे क्र. 117/1, पाँपुलर नगर, वारजे, पुणे, महाराष्ट्र - 411052, **शाखा पिंपरी चिंचवड :** कार्यालय क्र. 302, तिसरा मजला, धोवाला कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, चिंचवड, पुणे, महाराष्ट्र - 411019, **शाखा खराडी :** तिसरा मजला, गणलक्ष्मी कॉम्प्लेक्स, सर्व्हे क्र. 08, हडपसर खराडी बायपास रोड, खराडी, पुणे, महाराष्ट्र - 411014, **शाखा कोंढवा :** 560, पाचवा मजला, मार्वल क्विस्टा, स. क्र. 599पै=598+593ए, साहनी सुजन पार्क, लुल्ला नगर, पुणे - 411040.

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भाग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी रचनात्मक / प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ इ सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची "जशी आहे जेथे आहे" आणि "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल. याद्वारे ही सूचना सह दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम - 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊन करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे / न्यायालयीन कजे (के)
HOU/PUN/0820/809019, प्रेम सोपान कोकरे / नितल प्रेम कोकरे / आर्यन युनियन गॅलरी, शाखा : पुणे	रु. 30,51,843.97 आणि 14-09-2023	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट क्र. 1107, 11वा मजला, विंग बी, राजलक्ष्मी ग्रीन्स, सर्व्हे क्र 153/1सी, रावेत, पुणे, महाराष्ट्र, भारत - 412101.	रु. 41,33,000	रु. 4,13,300	14/12/2026	रु. 10,000	13-11-2026 दु. 12:00 ते दु. 04:00	15-12-2026 दु. 2 ते दु. 03:00	ज्ञात नाही
HOU/PUN/0318/501987, देवराज दामोदर धेंडे / वैशाली देवराज धेंडे, शाखा : पुणे	रु. 11,77,099.78 आणि 14-05-2025	प्रत्यक्ष ताबा	इमारत सी1, तळमजला, 8, प्लॉटेर पौड सी, गट क्र. 245 (पी), पौड गाव मुळशी, पुणे, महाराष्ट्र - 412115, भारत.	रु. 7,33,000	रु. 73,300	25/11/2026	रु. 10,000	20-11-2026 दु. 12:00 ते दु. 04:00	26-11-2026 दु. 2 ते दु. 03:00	ज्ञात नाही
HOU/WRJE/0317/363182 आणि HOU/WRJE/0317/367391, अविनाश जयराम अवघडे / निकिता अविनाश अवघडे, शाखा : वारजे	रु. 12,95,373.37 आणि 17-11-2021	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट क्र 305, स क्र 31 2, विंग जी, सिद्धिविनायक पार्क वडकी हडपसर, पुणे, महाराष्ट्र - 412308, भारत.	रु. 6,91,000	रु. 69,100	25/11/2026	रु. 10,000	21-11-2026 दु. 12:00 ते दु. 04:00	26-11-2026 दु. 2 ते दु. 03:00	ज्ञात नाही
HOU/PM/0316/274514, संगिता प्रमोद देशमुख / चित्रा प्रमोद देशमुख, शाखा : पिंपरी चिंचवड	रु. 23,87,512.41 आणि 13-03-2025	प्रत्यक्ष ताबा	इमारत ए, 13, 1304, मेलगे रेसिडेन्सेस, स. क्र. 11(पी), भोईवाडी, हिंजवडी फेज-III, ता. - मुळशी, पुणे, महाराष्ट्र - 411057, भारत.	रु. 34,18